**श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विदयापीठ**
**दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र**
**सर विठ्ठलदास विद्याविहार, जुहू तारा रोड, सांताक्रुझ (प.), मुंबई – ४०० ०४९**
**संपर्क : ०२२-२६६६०७७५८ Email Id: cde@sndt.ac.in**

**CDOE/33/2024-25/ 239** **१४ फेब्रुवारी २०२५**

**श्रीमती ना.दा.ठा. महिला विद्यापीठ (S.N.D.T. Women's University), दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र (Centre for Distance and Online Education- CDOE) मार्फत शैक्षणिक वर्ष २०२४ – २५, सत्र जानेवारी २०२५ आणि तदनंतर पुढील शैक्षणिक वर्षांसाठी, दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राचे अभ्यास केंद्र/ विद्यार्थी सहाय्यता केंद्र सुरु करण्यासाठी पात्र शैक्षणिक संस्थाकडून आवेदन अर्ज मागणीबाबत**

**संदर्भ :**

- University Grants Commission (Open and Distance Learning Programmes and Online Programmes) Regulation, 2020.
- S.N.D.T. Women's University, scheme for recognized study centre

महोदय / महोदया,

श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ (S.N.D.T. Women's University) संचलित दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र (Centre for Distance and Online Education- CDOE) मार्फत शैक्षणिक वर्ष २०२४–२५ सत्र जानेवारी २०२५ आणि तदनंतर पुढील शैक्षणिक वर्षांसाठी दूरस्थ शिक्षण केंद्राचे विद्यापीठ अनुदान आयोग (UGC-DEB) मान्यताप्राप्त पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम तसेच एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठ मान्यता प्राप्त विविध प्रमाणपत्र आणि पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमांसाठी दूरस्थ शिक्षण केंद्राचे अभ्यास क्रेंद्र म्हणून मान्यता प्राप्त करण्यासाठी उत्सुक असलेल्या शैक्षणिक संस्थांकडून दिनांक १५ मार्च २०२५ पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत.

महाराष्ट्रातील विविध तालुके व जिल्हयांच्या ठिकाणी विद्यार्थ्यांना शैक्षणिक मार्गदर्शन, सहकार्य तसेच दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्रातील अभ्यासक्रमांशी निगडीत विविध उपक्रम, अध्ययन व अध्यापनाच्या प्रक्रिया राबविण्यासाठी अभ्यास केंद्राना मान्यता दिली जाणार आहे. सदर अभ्यास केंद्राच्या मान्यतेची प्रक्रिया विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वर्ष २०२० च्या नियमनानुसार [University Grants Commission (Open and Distance Learning Programmes and Online Programmes) Regulation, 2020.] तसेच एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या दुरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या अभ्यास केंद्राबाबतची नियमावली यांना अधिनस्त राहून श्रीमती ना.दा. ठा. महिला विद्यापीठामार्फत राबविण्यात येईल.

अभ्यास केंद्र मान्यतेसाठी इच्छुक संस्थांकडून अभ्यास केंद्र मान्यतेसाठी दिनांक १५ मार्च २०२५ पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत.विहित कालावधीत प्राप्त झालेल्या अर्जांची पडताळणी केल्यानंतर विद्यापीठाकडून संबंधित पात्र शैक्षणिक संस्थांना अभ्यास केंद्र म्हणून मान्यता देण्यात येईल. अभ्यास केंद्र मान्यतेसाठी इच्छुक संस्थांनी पुढील अटी आणि शर्तींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

| **अनु.क्र** | **अटी व शर्ती** |
|---|---|
| १. | महाविद्यालयांसाठी आवश्यक शासन मान्यता |
| २. | महाविद्यालयाचे विद्यापीठ संलग्नता पत्र |
| ३. | महाविद्यालयाच्या संस्थेचे / ट्रस्टचे नोंदणी प्रमाणपत्र |
| ४. | अभ्यास केंद्र / विद्यार्थी सहायता केंद्र सुरु करण्याबाबतचा संस्थेचा अथवा ट्रस्टचा ठराव |
| ५. | महाविद्यालयातील शिक्षक यादी |
| ६. | दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंदाचे सर्व नियम मान्य असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र |
| ७. | प्रक्रिया शुल्क रुपये ५००/- मात्र (Demand Draft in the favour of<br>**'THE REGISTRAR S.N.DT. WOMEN'S UNIVERSITY, MUMBAI)** |
| ८. | अनामत रक्कम रुपये ५०००/- (अक्षरी रुपये पाच हजार मात्र)<br>(Demand Draft in the favour of **'THE REGISTRAR S.N.DT. WOMEN'S UNIVERSITY, MUMBAI)** |

अभ्यास केंद्र मान्यतेसाठी आवेदन अर्ज भरताना काही शंका अथवा समस्या असल्यास ०२२- २६६०७७५८ या क्रमांकावर अथवा cde@sndt.ac.in या ईमेल आयडी वर संपर्क साधावा.

**सही /-**
**(डॉ. मंगेश कदम)**
**संचालक (अति. कार्यभार)**
**दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र**